# सोलापुरात आभाळ फाटलं

अस्सल सोलापुरी

**सुराज्य**

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । शुक्रवार, दि. १२ सप्टेंबर २०२५ । ▸ वर्ष : २३ वे ▸ अंक : ३४३ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने १२

## ड्रेनेजमधील दुर्गंधीच्या पाण्याच्या धारा नागरिकांच्या घरात टक्केवारी मलिद्याच्या 'अमृत'धारा नेमक्या कोणाच्या घशात?

राज्य सरकारच्या अमृत योजनेतून महापालिकेच्यावतीने शेळगी, दहिटणे, विडी घरकुलसह अन्य ठिकाणी नव्याने ड्रेनेज लाईन पसरण्यात आल्या होत्या. त्याचे काम निकृष्ट दर्जांचे तर झालेच झाले. पण त्या निरुपयोगी ठरल्याचे कालच्या पावसाने सिद्ध झाले. ड्रेनेजमधील दूर्गंधीचे पाणी नागरिकांच्या घरात आले. त्यातून नागरिकांनी संताप व्यक्त केला. निकृष्ट दर्जाचे आणि निरुपयोगी कामे करुन टक्केवारीच्या मलिद्याची 'अमृत'धार नेमकी कोणाच्या घशात गेली? अशी चर्चा या योजनेचा बोजवार उडाल्यानंतर सुरु झाली आहे.






**नागरिकांचे हाल बेहाल** | # हाहाकार | **अतिवृष्टीने काळजाचे पाणी**

## पाणी घरा-दारात...पाणी शेत-शिवारात...अन् पाणी डोळ्यातसुद्धा..!

### सोलापुरातील 'हे' भाग झाले अधिक बाधित

शेळगी, मित्रनगर, विद्या नगर, विडी घरकुल, गोंधळे वस्ती रोड, अक्कलकोट रोड सादूल पेट्रोल पंप परिसर, २६५ गाळे परिसर, दहिटणे गाव, जुना कारंबा नाका परिसर, गणेश नगर, सुनिल नगर,निलम नगर, वज्रेश्वर नगर, कुमार स्वामी नगर,आदर्श नगर, बसवेश्वर नगर, अवंती नगर, जुना पुणे नाका आदी.

### थेट बाधित भागातून...

- ✔ अचानक ढगफुटीप्रमाणे पाऊस आल्याने नागरिकांवर बेघर होण्याची वेळ
- ✔ महापालिका आयुक्त डॉ. ओम्बासे आणि आमदार विजयकुमा देशमुख यांच्याकडून बाधित भागाची पाहणी, उपायोजनांसाठी सुचना
- ✔ महापालिकेकडून तातडीने उपयोजना सुरु, मात्र नागरिकांच्या तक्रारी
- ✔ घरातील संसारपयोगी साहित्य पाण्यात बुडाल्याने बाधित नागरिकांवर उपासमारीची ओढावली आफत
- ✔ ड्रेनेज लाईन ओव्हरफ्लो होवून दूर्गंधीयुक्त पाणी घरांमध्ये शिरल्याने नाराजी

✔ सोलापूर/प्रतिनिधी

**मुख्यत्वे, सोलापूर शहरातील शेळगी, दहिटणे, विडी घरकुल, अक्कलकोट रोडसह उत्तर तसेच दक्षिण सोलापूर, अक्कलकोट तालुक्याच्या अनेक भागात बुधवार मध्यरात्री १ वाजलेपासून गुरुवारी पहाटे ५ वाजेपर्यंत अतिमुसळधार पाऊस पडला.जणू काही आभाळ फाटलं. ढगफुटीसदृश्य पावसाच्या पाण्याने रस्त्यांना नदीचे स्वरुप आले. अनेक नगरांमधील घरे तसेच अक्कलकोट तालुक्यातील शिरवळ, सुलतानपूरसह अन्य ठिकाणी शेतांमध्ये पाणी घूसून प्रचंड नुकसान झाले. नागरिकांच्या जीवावर उठलेला पाऊस मागच्या २४ तासांत ११८.३ मिमि म्हणजे ४ इंच कोसळला. परतीच्या पावसाने झोडपण्यातून नागरिकांचे अतोनात हाल झाले. घरा-दारांबरोबरच रस्त्यांवर पाणी उभा राहिल्यानं अबाल वृद्धांसह सर्वांनाच कोठे आश्रय घ्यायचा असा प्रश्न निर्माण झाले. नागरिकांचे हाल-बेहाल झाले. घरांमध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी शिरल्याने अन्नधान्यांसह संसारपयोग साहित्य पाण्यात बुडाले. मोठ्या प्रमाणात पावसाने झोडपल्याने जनजीवन विस्कळीत झाले. सर्वत्र हाहाकार माजला.**

दरम्यान साधारण ५ तास आभाळ फाटल्याप्रमाणे पडलेल्या पावसामुळे सर्वत्र पाणीच पाणी झाले. सोलापूर-पुणे राष्ट्रीय महामार्ग गुरुवारी बराच वेळ पाण्याखाली गेल्याने वाहतुकीची मोठी कोंडी निर्माण झाली होती. अवंती नगर परिसरातदेखील प्रचंड प्रमाणात पाणी आल्याने रस्ते वाहतुकीसाठी बंद झाले. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे तसेच आमदार विजयकुमार देशमुख, माजी नगरसेवक प्रथमेश कोठे आदींनी बाधित भागाची पाहणी करुन तातडीने उपाय योजना सुरु केल्या. मात्र सर्वच बाधित भागात अद्याप उपाययोजना चालू झाल्या नाहीत, अशा तक्रारी गुरुवारी रात्री उशीरापर्यंत बाधित भागातील नागरिकांच्या राहिल्या.

पर्जन्यवृष्टीचे छायाचित्रांसह अधिक वृत्तांकन पान १२ वर

### कोठे, देशमुख परिवाराकडून अन्नदान

विडी घरकुल, शेळगी, दहिटणे आदी भागातील घरांमध्ये पाणी शिरल्याने बुधवारी मध्यरात्रीपासून नागरिकांचे हाल होत राहिले. अन्नधान्य आणि संसारपयोगी साहित्य पूर्णपणे पाण्यात बुडल्याने नागरिक रस्त्यावर आले. त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली. आमदार विजयकुमार देशमुख, माजी नगरसेवक डॉ. किरण देशमुख आणि माजी नगरसेवक प्रथमेश कोठे यांच्यासह अनेकांनी बाधित नागरिकांची भोजनाची सोय केली.

### ग्राऊंड रिपोर्टमधील काही हायलाइट्स...

- ✔ सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्ग पाण्याखाली गेल्याने काही तास वाहतूक विस्कळीत
- ✔ सोलापूर-गाणगापूर मार्गावरील एसटी बस सेवा गुरुवारी बंद राहिल्याची माहिती
- ✔ सोलापुरातील आवंती नगर परिसरातील रस्ता दूपारी दोननंतर वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात आल्याचे माहिती
- ✔ मोहोळ तालुक्यातील शिरापूर परिसरातील रस्ते बंद झाल्याचे प्रशासनाकडून आले सांगण्यात
- ✔ गुरुवारी दूपारी डोणगाव रस्ता वाहतुकीसाठी बंद करण्यात आल्याच्या प्रशासनाकडून नागरिकांना सुचना
- ✔ माजी नगरसेवक प्रथमेश कोठे यांच्याकडून विडी घरकूल परिसराची पाहणी,तातडीने उपाय योजना करण्यासाठीची सर्तकता
- ✔ बाधित भागातील शाळांना गुरुवारी देण्यात आली सुट्टी

### ५० वर्षानंतर विक्रमी पाऊस, जिल्ह्यातील बळीराजा हवालदिल

यंदाच्या वर्षी साधारण ५० वर्षानंतर विक्रमी पाऊस कोसळत आहे. त्यातून खरीप पिके हातची गेली. ढगफुटीसारख्या पावसाने शेतजमिनींचे अतोनात नुकसान झाले आहे. त्यातून शेतकरी हवालदिल झाला आहे. होत्याचे नव्हते झाले.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



इतकी सवय नव्हती!

संगम श्री डे
455-49-379

संगम श्री नाईट
348-56-466

कल्याण
370-01-137

मुंबई
135-91-579

## पालकमंत्र्यांसोबतची दोस्ती अन् भाजप प्रवेशाची वाट मानेंना तारणार का? सभापतीपदावरुन हटवण्यासाठी विरोधक टाकणार कोणता नवा डाव?



(संग्रहित छायाचित्र)



देवेंद्र फडणवीस



जयकुमार गोरे



दिलीप माने

- सुरक्षा कवच मिळविताना मुंबईतील वर्षा निवासस्थान, मंत्रालय व्हाया बोराटवाडी ट्रॅकवरुन दिलीप मानेंच्या हालचाली
- सभापतींचे आसन डळमळीत करण्यासाठी विरोधकांच्या नव्या डावांसह आणि खेळ्यांची सर्वांनाच उत्सुक्ता

✔ सोलापूर/प्रतिनिधी

उत्तर आणि दक्षिण सोलापूरसह अक्कलकोट तालुक्याच्या राजकारणाचा केंद्र बिंदू असलेल्या श्री सिद्धेश्वर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये दिलीप माने यांना विद्यमान सभापतीपदावरुन हटविण्याचे षडयंत्र नाराजांकडून सुरु असताना, पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याशी असलेला दोस्ताना आणि त्यांनी धरलेली भाजप प्रवेशाची वाट याबाबी माने यांना तारणार असल्याचा प्रबळ दावा केला जात असून सभापती पदाची खुर्ची सेफ ठेवण्यसाठी मानेंनी मुख्यमंत्र्यांचे मुंबईमधील वर्षा निवासस्थान, मंत्रालय व्हाया बोराटवाडी माण-खटाव अशी फिल्डींग लावल्याची अधिकृत माहिती मिळत आहे.

दरम्यान, पालकमंत्री गोरे यांच्यामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांना वशीला लावून सभापतीपदाचे आसन सुरक्षित करण्याच्या दिलीप माने यांच्या बचावाच्या डावावर विरोधक कोणती भूमिका घेणार?

(अधिक वृत्त पान ७ वर...)

### ...तर देवाभाऊ मानेंच्या खुर्चीला देतील सुरक्षित कवच

दिलीप माने यांच्यासारखा उत्तर तसेच दक्षिण सोलापूर या दोन तालुक्यांसह सोलापूर शहरात मोठे वलय असलेला बडा प्रस्थापित नेता भाजपमध्ये येतोय, ही बाब पक्षासाठी व्हिजनरी आणि फायद्याची असल्याचे मानून मुख्यमंत्री फडणवीस हे मानेंची बाजार समिती सभापतीपदाची खुर्ची सुरक्षित करण्यासाठी सहकारमंत्री पाटील यांना निश्चितपणे सांगतील. 'आतून' सहकार्य करुन मानेंना ते भाजपचा सहकार्याचा हात देतील, असं राजकीय जाणकरांचे म्हणणे आहे. शिवाय तशा घडामोडी घडत आहेत.

### सहकारमंत्री पाटलांची भूमिका ठरेल महत्त्वाची

दिलीप माने यांच्याकडील सभापतीपदावर अविश्वासाचा ठराव आणण्यासाठी माने यांच्यावरील असंतुष्टांनी कितीही प्रयत्न केले.खूप काही शिजवलं तरीपण सहकार आणि पणन मंत्री बाबासाहेब पाटील यांची भूमिका या प्रकरणी सर्वात महत्त्वाची ठरणार आहे. दिलीप माने यांनी पालकमंत्री यांच्यामार्फत मुख्यमंत्र्यांकडून सहकारमंत्री पाटील यांना सांगायला लावल्यास पाटील यांना वेगळी भूमिका घेता येणार नाही, त्यातून माने हे सभापतीपदावर सेफ राहु शकतात. भाजपमध्ये जाणे हे मानेंना सभापतीपदाचे सिंहासन टिकवण्यासाठी हिताचे होईल, असे जाणकार सांगताहेत.